
ePaper

## डिझेलमध्येही बायोफ्युएलची भर; 15% आइसोब्यूटेनॉल मिश्रणाची तयारी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 05 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

२८ एकरात होणार 'आयआयएम'

## इराणचा अमेरिका-इस्त्राईलला धमकी वजा इशारा

# 'खामेनींच्या हत्येचा बदला घेणार..!'

**महाईन्यूज । तेहरान**

**इराणचे माजी सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही, असा स्पष्ट इशारा इराणच्या सशस्त्र दलाचे प्रमुख मेजर जनरल अमीर हातामी यांनी अमेरिका आणि इस्रायलला दिला. तेहरानमध्ये सुरू असलेल्या अंत्यसंस्कार विधी दरम्यान ते बोलत होते. इराण अधिक ठाम निर्धाराने प्रत्युत्तर देईल. इराणी जनतेच्या शत्रूंना अमेरिका आणि गुन्हेगार झायनिस्ट राजवटीला सांगू इच्छितो की, आम्ही शहीद नेत्याच्या रक्ताचा बदला घेऊ, असे हातामी यांनी अंत्यसंस्कारस्थळी पत्रकारांशी बोलताना म्हटले.**



### हल्ल्याचा धोका

अंत्यसंस्काराच्या पार्श्वभूमीवर इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने अमेरिकेला आणि इस्रायलला कठोर इशारा दिला आहे. या काळात इराणवर किंवा अंत्यसंस्कार सोहळ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्यास यापूर्वीपेक्षा अधिक कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असे आयआरजीसीने स्पष्ट केले. इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी इराणचे नवे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी हेही लक्ष्य असल्याचा दावा केल्यानंतर इराणने सुरक्षा वाढवत तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी संयुक्त राष्ट्रांकडे केली आहे.

दरम्यान, खामेनी यांच्या अंत्यसंस्काराची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून ४ ते ९ जुलैदरम्यान सहा दिवसांचा राजकीय इतमामात अंत्यसंस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यासाठी जगभरातील १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, अनेक राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, वरिष्ठ मंत्री आणि धार्मिक नेते तेहरानमध्ये दाखल झाले आहेत. सुमारे दीड ते दोन कोटी नागरिक अंत्यदर्शन आणि अंत्ययात्रेत सहभागी होतील, असा अंदाज इराणी प्रशासनाने व्यक्त केला आहे. त्यामुळे हा इराणच्या इतिहासातील सर्वात मोठ्या राजकीय अंत्यसंस्कारांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. संभाव्य हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन तेहरानमध्ये अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

### श्रद्धांजली कार्यक्रमाला प्रारंभ

३ जुलैपासून तेहरानमध्ये श्रद्धांजली कार्यक्रमाला सुरुवात झाली. राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन, संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर घालीबाफ, न्यायव्यवस्था आणि सरकारमधील वरिष्ठ अधिकारी यांनी खामेनी यांच्या पार्थिवाला श्रद्धांजली अर्पण केली. काळ्या पगडीने सजवलेल्या शवपेटीपाशी राष्ट्राध्यक्षांनी प्रार्थना केली. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) चे प्रमुख अहमद वहिदी यांनीही युद्ध सुरू झाल्यानंतर प्रथमच सार्वजनिकरीत्या हजेरी लावत खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली. सुरक्षा कारणांमुळे ते सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर होते.

### हल्ल्याच्या स्थळी पार्थिव नेले

इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, खामेनी यांचे पार्थिव गुरुवारी तेहरानमधील त्यांच्यावर हल्ला झालेल्या ठिकाणी नेण्यात आले. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हवाई हल्ल्यात त्यांची हत्या झाली होती. हा कार्यक्रम कोणतीही पूर्वसूचना न देता पार पडला. त्यानंतर राज्य इतमामात होणाऱ्या अंत्यसंस्काराच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात आले. अंत्यसंस्कार कार्यक्रमात १ ते २ कोटी नागरिक सहभागी होऊ शकतात.

### अंत्यसंस्काराचे वेळापत्रक

**४ आणि ५ जुलै :-**
तेहरानमध्ये सार्वजनिक श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. अली खामेनी आणि त्यांच्या कुटुंबातील काही सदस्यांचे पार्थिव ग्रँड मोसल्ला येथे सर्वसामान्य नागरिकांच्या अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

**६ आणि ७ जुलै :-**
अंत्ययात्रा तेहरानमधील विविध भागांतून काढण्यात येईल. त्यानंतर ती इराणमधील शिया इस्लामचे प्रमुख धार्मिक शिक्षणकेंद्र मानल्या जाणाऱ्या कोम शहरात पोहोचेल. अली खामेनी यांनी याच ठिकाणी धार्मिक शिक्षण घेतले होते.

**८ जुलै :-**
इराकमधील नजफ आणि कर्बला येथे सार्वजनिक अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे. नजफ येथील इमाम अली दर्गा हे शिया मुस्लिमांचे सर्वात पवित्र धार्मिक स्थळांपैकी एक मानले जाते. कर्बला येथील इमाम हुसेन आणि त्यांचे सावत्र बंधू अब्बास यांच्या दर्ग्यांनाही शिया मुस्लिमांमध्ये अत्यंत पवित्र स्थान आहे.

**९ जुलै :-**
अली खामेनी यांचे पार्थिव पुन्हा इराणमध्ये आणण्यात येईल. त्याच दिवशी मशहद येथील इमाम रझा दर्गा येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# पीएम पोषण योजना पूर्णपणे ऑनलाइन

## तांदूळ साठा, खर्च व विद्यार्थ्यांच्या लाभार्थी नोंदी आता एमडीएम पोर्टलवरच अनिवार्य

**महाईन्यूज । पुणे**

**प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण (पीएम पोषण) योजनेअंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांमध्ये तांदूळ व धान्यादी मालाचा खर्च, शिल्लक साठा आणि दैनंदिन लाभार्थी नोंदी आता पूर्णपणे ऑनलाइन करण्यात येणार आहेत. यामुळे शाळांमध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्याची आवश्यकता राहणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात प्राथमिकचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी सर्व शिक्षणाधिकारी व संबंधित यंत्रणांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.**



गोसावी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, राज्यातील सर्व पात्र शाळांनी ३० एप्रिल २०२६ अखेर किंवा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील आहार वितरणाचा शेवटचा दिवस यानुसार उपलब्ध असलेला तांदूळ व धान्यादी मालाचा शिल्लक साठा एमडीएम पोर्टलवरील सुरुवातीची शिल्लक टॅबमध्ये नोंदविणे बंधनकारक केले आहे.

ही नोंद इयत्ता १ ली ते ५ वी आणि इयत्ता ६ वी ते ८ वी अशा स्वतंत्र स्वरूपात किलोग्रॅममध्ये करावी लागणार आहे. शाळांनी शिल्लक साठ्याची माहिती भरल्यानंतर तिची पडताळणी करून जतन करा आणि अंतिम कर करणे आवश्यक राहणार आहे. त्यानंतर जिल्हास्तरावर निश्चित केलेल्या पाककृतीनुसार विद्यार्थ्यांना देण्यात आले.

माहिती एमडीएम पोर्टल, मोबाईल ॲप किंवा मेसेजद्वारे नियमितपणे नोंदवावी लागणार आहे. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांनी तांदूळ व इतर धान्याची प्राप्ती, खर्च आणि शिल्लक साठ्याची माहिती एमडीएम पोर्टलवर वेळेत ऑनलाइन नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक महिनाअखेरीस खर्च व शिल्लक साठ्याचा एकत्रित पीडीएफ अहवाल उपलब्ध होणार असून, तो जतन केल्यास स्वतंत्र नोंदवहीची गरज राहणार नाही.

राज्यातील सर्व पात्र शाळांनी ३० एप्रिल २०२६ अखेर किंवा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील आहार वितरणाचा शेवटचा दिवस यानुसार उपलब्ध असलेल्या तांदूळ व इतर धान्याच्या शिल्लक साठ्याची नोंद एमडीएम पोर्टलवरील 'सुरुवातीची शिल्लक' टॅबमध्ये करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही नोंद इयत्ता १ ली ते ५ वी आणि इयत्ता ६ वी ते ८ वी अशा स्वतंत्र स्वरूपात किलोग्रॅममध्ये भरावी लागणार आहे. माहिती भरल्यानंतर तिची पडताळणी करून जतन करणे आणि अंतिम सादर करणे आवश्यक राहणार आहे. या प्रक्रियेनंतर जिल्हास्तरावर निश्चित केलेल्या पाककृतीनुसार विद्यार्थ्यांना आहार वितरण करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांनी तांदूळ व इतर धान्याची प्राप्ती, खर्च आणि शिल्लक साठ्याची माहिती एमडीएम पोर्टल, मोबाईल ॲप किंवा संदेशाद्वारे नियमितपणे ऑनलाइन नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक महिनाअखेरीस खर्च व शिल्लक साठ्याचा एकत्रित पीडीएफ अहवाल उपलब्ध होणार आहे.

### नवीन ॲप डाउनलोड करण्याच्या सूचना

मोबाईल ॲपमध्ये जिल्हानिहाय मेनू दिसत नसल्यास नवीन ॲप स्थापित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गटशिक्षणाधिकारी, पीएम पोषण अधीक्षक आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी ऑनलाइन नोंदींची पडताळणी, तांत्रिक अडचणींचे निराकरण व नियमित देखरेख करावी, असेही निर्देश आहेत. प्रारंभिक शिल्लक, आवक माल, मोबाईल ॲप आणि दैनंदिन उपस्थिती यासाठी चार माहिती पुस्तिका शाळांना उपलब्ध करून दिल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# तीन महिन्यांमध्येच पुणे महापालिकेला मिळकत करातून मिळाले १,३९५ कोटी

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या मिळकतकर विभागाने पहिल्या तीन महिन्यांतच १ हजार ३९५ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. गेल्या पाच वर्षांतील पहिल्या तिमाहीतील सर्वाधिक करसंकलन यंदा झाले आहे. ७ लाख ४० हजार २८२ मालमत्ताधारकांनी मिळकतकर भरला असून ऑनलाई च्या माध्यमातून मिळकतकर भरण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.**




महापालिकेचे आर्थिक वर्ष एप्रिलपासून सुरू होते. पहिल्या तीन महिन्यामध्ये जून अखेरपर्यंत निवासी मालमत्तांमधून ६ लाख १५ हजार ३५२ मालमत्ताधारकांनी ६८८.१९ कोटी रुपयांचा कर भरला आहे. बिगरनिवासी मालमत्तांमधून ८७ हजार ५९६ करदात्यांकडून ५६७.०२ कोटी रुपयांचे उत्पन्न, तर मोकळ्या भूखंडांमधून ४५.३८ कोटी रुपये, मिश्र स्वरूपाच्या मालमत्तांमधून ९५.२७ कोटी रुपयांचा मिळकतकर जमा झाला आहे.

गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत यंदा पहिल्या तीन महिन्यामध्ये मिळकत कर संकलनात वाढ झाल्याचे चित्र दिसून आले आहे. २०२२-२३ मध्ये १,०७८.९७ कोटी, २०२३-२४ मध्ये ५३५.३२ कोटी, २०२४-२५ मध्ये १,३८८.७९ कोटी, २०२५-२६ मध्ये १,२९२.९४ कोटी, तर यंदा १,३९५.८६ कोटी रुपयांचे संकलन पहिल्या तीन महिन्यांमध्ये झाले आहे.

मिळकतकर भरताना नागरिकांनी ऑनलाइन व्यवहारांना सर्वात अधिक पसंती दिल्याचे समोर आले आहे. एकूण ५ लाख ४१ हजार ५०० मिळकतदारांनी ऑनलाइन पद्धतीने ९२७.०२ कोटी रुपयांचा कर भरला. रोख स्वरूपात १ लाख २२ हजार ७६२ नागरिकांनी ११४.३८ कोटी रुपये, तर धनादेश तसेच डिमांड ड्राफ्टद्वारे ७६ हजार २० नागरिकांनी ३५४.४६ कोटी रुपयांचा मिळकत कर महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले, मिळकतकर विभागाने या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यात १,३९५.८६ कोटी रुपयांचा मिळकत कर जमा केला आहे. मागील वर्षाच्या पहिल्या तीन महिन्याच्या या तुलनेत हा कर सुमारे १०३ कोटी रुपयांनी अधिक आहे.

### सर्वांत अधिक महसूल झोन २ मधून जमा

महापालिकेच्या झोन क्रमांक २ मधून सर्वाधिक ३९२.४८ कोटी रुपयांचा मिळकतकर जमा झाला आहे. त्यापाठोपाठ झोन क्रमांक १ मधून ३७७.९३ कोटी, झोन क्रमांक ४ मधून २९२.२८ कोटी, झोन क्रमांक ३ मधून २०४.५७ कोटी आणि झोन क्रमांक ५ मधून ११७.८१ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला. जीएमआर मालमत्तांमधून स्वतंत्रपणे १०.७९ कोटी रुपयांचा मिळकत कर जमा झाला आहे. मिळकत कर विभाग त्यांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण करतील, असा विश्वास पुणे महानगरपालिकेने व्यक्त केला आहे.


# २८ एकरात होणार 'आयआयएम'

## महसूल व वन विभागाकडून अध्यादेश जारी; आमदार महेश लांडगे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी येथे प्रस्तावित भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) नागपूरच्या शैक्षणिक व प्रशिक्षण कॅम्पस उभारणीली गती मिळाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी करून मोशी येथील गट क्रमांक ३२७ मधील २८ हेक्टर सरकारी जमीन नाममात्र वार्षिक भाडेपट्ट्याने संस्थेला उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे.**







त्यामुळे पिंपरी-चिंचवड परिसरात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी भर पडणार आहे. या निमित्ताने भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या 'व्हीजन' मधील आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प दृष्टीक्षेपात आला आहे.

शासनाने ३ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या निर्णयानुसार, मोशी येथील एकूण ३७ हेक्टर ०२ आर क्षेत्रापैकी २८ हेक्टर जमीन भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) नागपूरला शैक्षणिक आणि प्रशिक्षण कॅम्पस उभारण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या जमिनीचा भाडेपट्टा सुरुवातीला ४९ वर्षांसाठी असून, त्यानंतर पुढील ४९ वर्षांसाठीही नूतनीकरणाची तरतूद केली आहे. यासाठी प्रतिवर्षी केवळ एक रुपया नाममात्र भाडे आकारण्यात येणार आहे.

यापूर्वी या जमिनीबाबत शासनाने बाजारमूल्यानुसार किंमत आकारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, राज्य मंत्रिमंडळाने २१ जून २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानंतर तो निर्णय रद्द करून शिक्षणाच्या व्यापक हिताचा विचार करत नाममात्र भाडेपट्ट्यावर जमीन देण्याचा सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार संबंधित जमीन केवळ शैक्षणिक आणि प्रशिक्षणाच्या उद्देशासाठीच वापरता येणार असून, शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय तिची विक्री, हस्तांतरण, तारण किंवा इतर कोणताही व्यावसायिक वापर करता येणार नाही. तसेच, संस्थेच्या अभ्यासक्रमांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी, उद्योजक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्राधान्य किंवा सवलतीचा विचार करण्याची अटही शासनाने घातली आहे. आता पिंपरी-चिंचवड परिसरात जागतिक दर्जाच्या व्यवस्थापन शिक्षण आणि संशोधनाला चालना मिळणार असून, उच्च शिक्षणाचे नवे केंद्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक विद्यार्थ्यांसह उद्योग क्षेत्रालाही या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार असल्याचे मानले जात आहे.

> पिंपरी-चिंचवड ही केवळ औद्योगिक नगरी न राहता शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाचे जागतिक केंद्र व्हावे, हा आमचा संकल्प आहे. शहराची ओळख 'एज्युकेशन हब' अशी व्हावी. मोशी येथे IIM चा कॅम्पस उभारण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्याच दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाने घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण त्यांच्या शहरातच उपलब्ध होणार असून, उद्योग आणि शिक्षण यांचा मजबूत दुवा निर्माण होईल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# भोसरीत स्टॉर्म वॉटर चेंबरमध्ये दुचाकी अडकली; महिला-मुलाचा बचाव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी परिसरात स्टॉर्म वॉटर लाईनच्या चेंबरमध्ये दुचाकीसह महिला व तीचा मुलगा फसल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. सुदैवाने नागरिकांनी तातडीने धाव घेत महिलेला बाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.**



भोसरी, बापूजी बुवा चौक, महात्मा महात्मा फुले शाळेजवळील औद्योगिक वसाहत रस्त्यावर पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी महापालिकेच्या ड्रेनेज विभागाकडून स्टॉर्म वॉटर लाईन व ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. या लाईनवर पाण्याचा निचरा होण्यासाठी ठिकठिकाणी छिद्र असलेले चेंबर बसविण्यात आले आहेत. परंतु, या चेंबरची दुरवस्था झाली आहे. याकडे महापालिकेचा संबंधित विभाग लक्ष देत नसल्याने व पावसाळापूर्व कामे पूर्ण झाल्याची बोंब ठोकणारे प्रशासन नागरिकांच्या जिवाशी खेळ खेळत असल्याने अशा घटना घडत आहेत. या ठिकाणी असलेले स्टॉर्म वॉटर लाईनच्या चेंबरमध्ये एका महिलेचे दुचाकी वाहन अडकले.

पाण्याचा निचरा होण्यासाठी स्टॉर्मवॉटर लाइन टाकली; परंतु चेंबर रस्त्यापेक्षा वर असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पावसाचे पाणी साचून राहत असल्याने चेंबर नागरिकांच्या व वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने दुचाकीचालक महिला व तीचा मुलगा या चेंबरमध्ये अडकून पडले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परता दाखवत महिलेची सुखरूप सुटका केली. या घटनेत महिलेला किरकोळ दुखापत झाली. नागरिकांनी परिसरातील सर्व स्टॉर्म वॉटर लाईन चेंबरची तातडीने पाहणी करून उघडी किंवा धोकादायक चेंबर्सची डागडुजी करण्याची मागणी केली आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने अशा ठिकाणी संरक्षक झाकणे, इशारा फलक आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने केल्या पाहिजेत. जेणे करून नागरिकांना धोक्याची कल्पना आली तर अशा दुर्घटना घडणार नाहीत, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

> पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका परिसरातील चेंबरची डागडुजी करण्यात येणार आहे. तसेच या ठिकाणी असलेले चेंबर दुर्गंधीयुक्त पाणी बॅक मारत असल्याने समस्या उद्भवली आहे. त्वरित पाहणी करून येथील लाईनची दुरुस्ती करण्यात येईल.
>
> **- साहेबराव पवार, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग.**



## भूमिका

**पश्चिम बंगालच्या राजकारणाने पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या राज्यावर तब्बल ३४ वर्षे डाव्या आघाडीचे वर्चस्व राहिले. २०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसने डाव्यांचा पराभव करून सत्ता हस्तगत केली आणि पुढील दीड दशक बंगालच्या राजकारणावर अधिराज्य गाजवले.**

# पक्षफुटीचा नवा पॅटर्न

ज्योती बसू आणि बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या नेतृत्वाखाली डाव्यांनी बंगालच्या राजकारणावर आपली छाप सोडली. मात्र १९९८ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली आणि काही वर्षांतच डाव्यांसमोर सक्षम पर्याय उभा केला. २०११ मध्ये तृणमूलने डाव्यांची सत्ता संपुष्टात आणत बंगालच्या राजकारणात नवे पर्व सुरू केले.

गेली अनेक वर्षे बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व आणि तृणमूल काँग्रेस हेच समीकरण मानले जात होते. मात्र अलीकडील राजकीय घडामोडींनी हे चित्र बदलण्यास सुरुवात केली आहे. पक्षातील मोठ्या प्रमाणावर आमदार आणि खासदार वेगळा मार्ग स्वीकारत असल्याने तृणमूलमध्ये मोठी फूट पडल्याचे



चित्र आहे. त्यानंतर बंडखोर गटाने "आम्हीच खरा तृणमूल काँग्रेस" असल्याचा दावा केला असून पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यावरही हक्क सांगितला आहे.

हे चित्र महाराष्ट्रासाठी नवीन नाही. शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे गटाने आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील विभाजनानंतर अजित पवार गटानेही अशाच प्रकारे मूळ पक्षावर दावा केला. निवडणूक आयोगाने विधिमंडळातील संख्याबळाला महत्त्व देत संबंधित गटांना पक्षाचे नाव आणि चिन्ह बहाल केले. त्यामुळे आता तृणमूल काँग्रेसच्या वादातही त्याच निकषांचा वापर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यातून एक गंभीर प्रश्न निर्माण होतो. पक्षाचा खरा वारस कोण ठरवायचा? केवळ आमदार-खासदारांचे संख्याबळ की पक्षाची संघटनात्मक रचना, कार्यकर्त्यांचा पाठिंबा आणि पक्ष स्थापनेचा इतिहास? लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष ही केवळ निवडून आलेल्या प्रतिनिधींची संस्था नसते; ती लाखो कार्यकर्त्यांच्या श्रमातून उभी राहिलेली संघटना असते. त्यामुळे केवळ विधिमंडळातील बहुमताच्या आधारावर पक्षाची ओळख निश्चित करणे हा निकष कितपत योग्य आहे, यावर व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे.

शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, पण त्यांनाच पक्षाचे नाव आणि चिन्ह गमवावे लागले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केलेली शिवसेना त्यांच्या वारसांकडूनही निसटली. आता ममता बॅनर्जी यांच्या पक्षासमोरही तसाच पेच उभा राहताना दिसत आहे. हा योगायोग मानायचा की भारतीय राजकारणात निर्माण झालेला नवा पॅटर्न, हा प्रश्न उपस्थित होतो.

अनेकदा पक्षफुटीची कारणे नेतृत्वशैलीत शोधली जातात. उद्धव ठाकरे यांच्यावर "घरी बसून पक्ष चालवला" अशी टीका झाली. परंतु शरद पवार आणि ममता बॅनर्जी हे सतत जनतेमध्ये फिरणारे नेते असूनही त्यांच्या पक्षांत फूट पडली. त्यामुळे पक्षफुटीची कारणे केवळ नेतृत्वशैलीत शोधणे वास्तववादी ठरत नाही. राजकीय सत्तासमीकरणे, सत्तेची आकर्षणे आणि बदलती राजकीय गणिते यांचाही त्यामागे मोठा वाटा असतो, हे नाकारता येत नाही.

## प्रासंगिक »

### दृष्टीकोन बदला

**एकदा एका राजाने खुश होऊन लोहाराला चंदनाची बाग भेट दिली. लोहाराला चंदनाच्या झाडांच्या किंमतीचे ज्ञान नव्हते. त्यामुळे त्याने त्या झाडांना कापून त्यांचा कोळसा करून विकला. हळूहळू संपूर्ण बाग रिकामी झाली.**

एक दिवस असेच राजा त्याच्या घरा जवळून जात होता, राजाला वाटले लोहार आता खुप श्रीमंत झाला असेल. परंतु प्रत्यक्षात पाहिल्यावर लोहाराची परिस्थिती पहिल्या सारखीच आहे असे दिसले, राजाला आश्चर्य वाटले. एक दिवस असेच राजा त्याच्या घरा जवळून जात होता, राजाला वाटले लोहार आता खुप श्रीमंत झाला असेल. परंतु प्रत्यक्षात पाहिल्यावर लोहाराची परिस्थिती पहिल्या सारखीच आहे असे दिसले, राजाला आश्चर्य वाटले. लोहार खुप रडू लागला, त्याने राजाला अजुन एक बाग देण्याची विनंती केली, तेंव्हा राजा म्हणाला "अशी भेट वारंवार भेटत नाही." मित्रांनो आपले आयुष्य त्या लोहारा सारखेच आहे.

- तात्पर्य : **या जगात दुर्लभ गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे, मनुष्य देह त्या देहाचा कोळसा करायचा की, चंदन हे आपले आपण ठरवायचे.**

ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टार्मर यांचा राजीनामा हा केवळ एका घटनेचा परिणाम नसून अनेक राजकीय, आर्थिक आणि नैतिक कारणांचा एकत्रित परिपाक मानावा लागेल. दोन वर्षांपूर्वी प्रचंड बहुमताने सत्तेत आलेल्या स्टार्मर यांच्या नेतृत्वाकडून जनतेला मोठ्या अपेक्षा होत्या.

# बहुमत असूनही नेतृत्व का कोसळले?




मात्र आर्थिक अडचणी, वाढती गुन्हेगारी, कायदा-सुव्यवस्थेतील बिघाड आणि जनविरोधी निर्णयांमुळे त्यांच्या लोकप्रियतेला मोठा धक्का बसला.

स्थानिक तसेच प्रादेशिक निवडणुकांमधील लेबर पक्षाच्या निराशाजनक कामगिरीने त्यांच्या नेतृत्वावरील विश्वास डळमळीत झाल्याचे स्पष्ट झाले. वेल्स आणि स्कॉटलंडमधील निवडणुकीतील अपयशाने आगामी सार्वत्रिक निवडणुकीबाबतही पक्षात चिंता निर्माण झाली. अनेक राजकीय विश्लेषकांनी स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली पुढील निवडणूक लढविल्यास पराभव अटळ असल्याचे मत व्यक्त केले.

त्यांच्या कार्यकाळात अनेक वादांनीही डोके वर काढले. 'फ्रीबीजगेट' प्रकरणात त्यांनी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांनी महागडी मोफत तिकिटे स्वीकारल्याने नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. तसेच अमेरिकेतील ब्रिटनचे राजदूत म्हणून लॉर्ड पीटर मेंडेलसन यांच्या नियुक्तीवरूनही मोठा वाद झाला. या घटनांमुळे सरकारची प्रतिमा मलिन झाली आणि जनतेचा विश्वास कमी झाला.

स्टार्मर यांच्यावर सातत्याने धोरणांमध्ये 'यू-टर्न' घेण्याचे आरोप झाले. दबाव वाढताच भूमिका बदलण्याची त्यांची पद्धत नेतृत्वातील ठामपणाच्या अभावाचे प्रतीक मानली गेली. याशिवाय निवृत्तीधारकांच्या हिवाळी इंधन भत्यात कपात, कारागृहांतील गर्दी कमी करण्यासाठी कैद्यांची मुदतपूर्व सुटका यांसारख्या निर्णयांमुळे जनतेत आणि स्वतःच्या पक्षातही नाराजी वाढली.

ब्रेक्झिटनंतरची आर्थिक आव्हाने, वाढती महागाई आणि मंदावलेली अर्थव्यवस्था यावर प्रभावी उपाय करण्यात सरकार अपयशी ठरल्याची भावना जनमानसात निर्माण झाली. प्रचंड बहुमत असूनही जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयश आल्यास राजकीय नेतृत्व किती लवकर अडचणीत येऊ शकते, याचे स्टार्मर यांचे उदाहरण ठरले.

किर स्टार्मर यांच्या राजीनाम्याने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे— केवळ प्रचंड बहुमत मिळविणे पुरेसे नसते; विश्वासार्ह नेतृत्व, नैतिक आचरण, ठोस धोरणे आणि जनतेच्या अपेक्षांशी सुसंगत निर्णय हेच सरकारच्या स्थैर्याचे खरे आधार असतात.

## ।। अभंगवाणी ।।



दुजा ऐसा कोण बळी आहे आतां ।
हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता ।
करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# खोट्या मोजमापांचा खेळ; बिरसी विमानतळ घोटाळा उघड

## प्रत्यक्ष कामापेक्षा १.१५ कोटी रुपये अधिक अदा केल्याचा आरोप



### बनावट मोजमापांचा 'खेळ' कसा झाला?

तपासानुसार, प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामाची किंमत ३.५० कोटी रुपये इतकी होती. मात्र, नोंदींमध्ये बनावट मोजमाप दाखवून ४.६५ कोटी रुपयांचे देयक मंजूर करण्यात आले. त्यामुळे १.१५ कोटी रुपयांहून अधिक रक्कम कंत्राटदाराला जादा अदा झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने शासकीय निधीचा अपहार केल्याचा संशय सीबीआयने व्यक्त केला आहे.

### CBIच्या तपासात काय निष्पन्न झाले?

सीबीआयच्या प्राथमिक चौकशीत धावपट्टी विस्तार व सीमाभिंतीच्या कामात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळले. तसेच संबंधित कंत्राटदाराकडून ९२.२९ लाख रुपये वसूल करणे अद्याप बाकी असल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी आणि कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

**महाईन्यूज । नागपूर**

**गोंदिया येथील बिरसी विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराच्या कामात कथित आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आल्याने केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसह संबंधित कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सुमारे १ कोटी १५ लाख रुपयांहून अधिक रकमेचा अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.**

सीबीआयच्या नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार, विमानतळ प्राधिकरणाचे सहायक महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी-सिव्हिल) संजीवकुमार सिंह, व्यवस्थापक (अभियांत्रिकी-सिव्हिल) भावेश पी. मेहता तसेच अन्य संबंधित अधिकारी आणि एम/एस रायसिंग अँड कंपनी यांच्यावर संगनमताने शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

गोंदियातील बिरसी विमानतळावरील धावपट्टी क्रमांक २२ च्या विस्तारित भागातील सीमाभिंत (OPERATIONAL BOUNDARY) आणि डीव्हीओआर (DVOR) संबंधित बांधकामाचा कार्यादेश २५ मे २०२३ रोजी एम/एस रायसिंग अँड कंपनीला देण्यात आला होता. जून २०२३ मध्ये सुरू झालेले हे काम फेब्रुवारी २०२४ मध्ये पूर्ण झाल्याचे नोंदीत नमूद आहे.

या प्रकल्पासाठी संजीवकुमार सिंह यांची सिव्हिल प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, तर त्यांना व्यवस्थापक भावेश मेहता यांचे सहकार्य होते. मात्र, कामाच्या मोजमापांमध्ये फेरफार करून प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक देयके मंजूर करण्यात आल्याचा संशय निर्माण झाल्यानंतर सीबीआयने प्राथमिक चौकशी सुरू केली होती.

तपासादरम्यान, प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामाची किंमत ३ कोटी ५० लाख ११ हजार ६६९ रुपये इतकी असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, खोट्या मोजमापांच्या आधारे ४ कोटी ६५ लाख ३७ हजार २५८ रुपये इतके देयक मंजूर करून अदा करण्यात आल्याचे समोर आले. त्यामुळे १ कोटी १५ लाख २५ हजार ५८९ रुपयांचे अतिरिक्त देयक कंत्राटदाराला अदा करण्यात आल्याचा आरोप आहे.

सीबीआयच्या चौकशीत संबंधित कंत्राटदाराकडून ९२ लाख २९ हजार १९० रुपये वसूल करणे अद्याप बाकी असल्याचेही स्पष्ट झाले आहे. या आर्थिक गैरव्यवहारामुळे विमानतळ प्राधिकरणातील कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सीबीआयकडून पुढील तपास सुरू आहे.

---

# मेळघाटात दमदार पावसाची हजेरी; चिखलदरा धुक्यात हरवले

**महाईन्यूज । अमरावती**

**जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून 'ऑरेंज अलर्ट'च्या पार्श्वभूमीवर दमदार पावसाने हजेरी लावली असून, मेळघाटातील पाच महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. दीर्घ खंडानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतीला मोठा दिलासा मिळाला असून, निसर्गरम्य वातावरणामुळे पर्यटकांची पावले पुन्हा विदर्भाच्या नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्याकडे वळली आहेत. पावसासह दाट धुक्याने चिखलदरा परिसर पूर्णपणे वेढला आहे.**



### पावसाचा फटका वाहतुकीला

मुसळधार पावसामुळे घटांग घाट व भोकरबर्डी परिसरात रस्त्यावर झाडे कोसळल्याने वाहतूक काही तास ठप्प झाली. तर धारणीजवळील टिंगऱ्या गावाच्या मार्गावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद ठेवावा लागला. प्रशासनाने नागरिकांना आणि पर्यटकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

मुसळधार पावसामुळे जनजीवनावरही परिणाम झाला. परतवाडा-धारणी-खंडवा या आंतरराज्य महामार्गावरील घटांग घाटाजवळ शुक्रवारी मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास मोठे झाड रस्त्यावर कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक तब्बल नऊ तास पूर्णपणे ठप्प झाली. रात्रीच्या वेळी वाहतूक बंद झाल्याने प्रवासी व वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

याशिवाय अमरावती-बऱ्हाणपूर मुख्य मार्गावरील भोकरबर्डी गावाजवळही झाड कोसळल्याने काही तास वाहतूक विस्कळीत झाली. धारणीपासून सुमारे तीन किलोमीटरवरील टिंगऱ्या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने सकाळपासून या मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली.

### मेळघाटात अतिवृष्टी; पर्यटकांची वाढली गर्दी

मेळघाटातील पाच महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाल्यानंतर संपूर्ण परिसर हिरवाईने नटला आहे. दाट धुके, धबधबे आणि आल्हाददायक वातावरणामुळे चिखलदरा परिसर पुन्हा पर्यटकांनी गजबजू लागला आहे. दीर्घ खंडानंतर झालेल्या दमदार पावसाने पर्यटनाला चालना मिळाली असून स्थानिक व्यावसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

दरम्यान, दीर्घ प्रतीक्षेनंतर झालेल्या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुसरीकडे, हिरवाईने नटलेल्या मेळघाट आणि चिखलदरा परिसराचे मनमोहक रूप पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे.

# पत्नीला परत आणण्याचा प्रयत्न जीवावर बेतला!

## कौटुंबिक वादातून अमृतसरमध्ये थरारक घटना; पत्नीसह मेव्हण्याला अटक

**महाईन्यूज । अमृतसर**

**कौटुंबिक वादानंतर पत्नीला तिच्या माहेरून परत घेऊन जाण्यासाठी गेलेल्या एका तरुणाला त्याच्या मेव्हण्याने अंगावर पेट्रोल ओतून जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यात घडली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला असून, त्यातून संपूर्ण प्रकार उघड झाला आहे.**







पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमृतसर जिल्ह्यातील लोपोके गावचा रहिवासी लवप्रीत सिंग हा १३ जून रोजी तरनतारन जिल्ह्यातील संघा गावात आपल्या पत्नी संदीप कौर हिच्या माहेरी गेला होता. लवप्रीत आणि संदीप यांचा विवाह सुमारे नऊ महिन्यांपूर्वी झाला होता. लग्नानंतर झालेल्या वादानंतर संदीप माहेरी परतली होती आणि तेव्हापासून ती तेथेच राहत होती.

पत्नीला परत घेऊन जाण्यासाठी लवप्रीत समजूत काढत असताना त्याचा मेव्हणा साजन सिंग याच्यासोबत वाद झाला. काही वेळातच वादाचे रूपांतर झटापटीत झाले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक व्यक्ती लवप्रीतच्या अंगावर पेट्रोलसारखा ज्वलनशील पदार्थ ओतताना आणि त्यानंतर लायटरने आग लावताना दिसत आहे.

आग वेगाने पसरल्याने लवप्रीत आणि त्याची मेव्हणी गुरजित कौर घाबरून पळताना दिसतात. गंभीर भाजल्याने लवप्रीतचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याला वाचवण्याचा प्रयत्न करणारी गुरजित कौर हिचाही काही दिवसांनी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

### सीसीटीव्हीत कैद झालेला थरार

सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी साजन सिंग लवप्रीत सिंगच्या अंगावर पेट्रोलसारखा ज्वलनशील पदार्थ ओतताना आणि त्यानंतर लायटरने आग लावताना स्पष्ट दिसत आहे. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले आणि लवप्रीत तसेच त्याला वाचवण्यासाठी धावलेल्या गुरजित कौर या दोघांनाही गंभीर भाजले. या प्रकरणात पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.


### पोलिसांची कारवाई

वरिष्ठ पोलीस अधीक्षक सुरेंद्र लांबा यांनी घटनेची पुष्टी केली. आरोपी साजन सिंग यालाही आगीत दुखापत झाली होती, मात्र उपस्थित नागरिकांनी त्याला वाचवले. पोलिसांनी साजन सिंग याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. तसेच, मृत लवप्रीतची पत्नी संदीप कौर हिलाही या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

# डिझेलमध्येही बायोफ्युएलची भर; १५% आइसोब्यूटेनॉल मिश्रणाची तयारी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल (E20) मिश्रणाची अंमलबजावणी यशस्वीपणे सुरू केल्यानंतर केंद्र सरकारने आता डिझेल इंधनासाठीही बायोफ्युएलचा वापर वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आइसोब्यूटेनॉल मिसळण्याच्या योजनेची घोषणा केली. या उपक्रमामुळे देशाची इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी होण्याबरोबरच परकीय चलनाची मोठ्या प्रमाणात बचत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.**




गडकरी यांनी सांगितले की, पेट्रोलप्रमाणे डिझेलमध्ये थेट इथेनॉल मिसळणे रासायनिकदृष्ट्या शक्य नसल्याने इथेनॉलवर प्रक्रिया करून त्यापासून आइसोब्यूटेनॉल तयार करण्यात येत आहे. हे इंधन डिझेलसाठी अधिक सक्षम आणि प्रभावी पर्याय ठरू शकते.

आइसोब्यूटेनॉलची ऊर्जा निर्मिती क्षमता इतर अनेक बायोफ्युएल्सपेक्षा अधिक असून, इंजिनच्या कार्यक्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. तसेच पारंपरिक डिझेलच्या तुलनेत यामधून कार्बन उत्सर्जनही कमी होते. तंत्रज्ञानाची क्षमता सिद्ध करण्यासाठी १०० टक्के इथेनॉल आणि आइसोब्यूटेनॉलवर दोन जनरेटर यशस्वीरित्या चालविण्यात आल्याचेही गडकरी यांनी सांगितले.

### देशाला काय होणार फायदा?

डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आइसोब्यूटेनॉल मिश्रणामुळे आयात होणाऱ्या खनिज तेलावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. यामुळे परकीय चलनाची बचत, शेतमालावर आधारित जैवइंधन उद्योगाला चालना, कार्बन उत्सर्जनात घट आणि ऊर्जा स्वावलंबनाकडे देशाची वाटचाल अधिक वेगाने होणार असल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे आहे.

दरम्यान, पेट्रोलियम मंत्रालयाने E20 पेट्रोलबाबत सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांचे खंडन केले आहे. इथेनॉल मिश्रित इंधनामुळे इंजिन खराब होत नाही, वाहनाची वॉरंटी किंवा विमा रद्द होत नाही, तसेच पर्यावरणालाही कोणतीही हानी पोहोचत नसल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, इथेनॉल मिश्रण कार्यक्रमामुळे आतापर्यंत देशाचे १.१ लाख कोटी रुपयांहून अधिक परकीय चलन वाचले असून, स्वच्छ इंधन आणि ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### आइसोब्यूटेनॉल म्हणजे काय?

आइसोब्यूटेनॉल हे इथेनॉलवर प्रक्रिया करून तयार केले जाणारे प्रगत जैवइंधन (ADVANCED BIOFUEL) आहे. डिझेलमध्ये इथेनॉल थेट मिसळता येत नसल्याने त्याऐवजी आइसोब्यूटेनॉलचा वापर केला जातो. यामध्ये ऊर्जा निर्मिती क्षमता अधिक असून, इंजिनची कार्यक्षमता टिकून राहते आणि कार्बन उत्सर्जनही तुलनेने कमी होते.



# टायगर मुथुवेल पांडियन पुन्हा मैदानात!

अखेर सुपरस्टार रजनीकांत यांच्या बहुप्रतीक्षित 'जेलर २' चित्रपटाची चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. निर्मात्यांनी चित्रपटाचा दमदार टीझर प्रदर्शित करत प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. नेल्सन दिलीपकुमार दिग्दर्शित हा चित्रपट १५ ऑक्टोबर म्हणजेच दसऱ्याच्या मुहूर्तावर देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. रिलीज झालेल्या टीझरने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. विशेष म्हणजे, टीझरमध्ये रजनीकांत यांचा चेहरा स्पष्टपणे दाखवलेला नसला तरी शेवटच्या क्षणी त्यांची दमदार झलक प्रेक्षकांना पाहायला मिळते. यामुळे सोशल मीडियावर 'जेलर २'ची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. टीझरची सुरुवात पहिल्या भागातील खलनायक वर्मन (विनायकन) याच्या दमदार संवादाने होते. तो आपल्या मोठ्या गुन्हेगारी जाळ्याचा इशारा देत सूडाची धमकी देताना दिसतो. त्यानंतर चित्रपटातील महत्त्वाच्या पात्रांची झलक दाखवली जाते आणि शेवटी दूर उभ्या असलेल्या रजनीकांत यांच्या एंट्रीने टीझरची सांगता होते.

# सान्याचा बोल्ड लुक

अभिनेत्री सान्या मल्होत्राला 'दंगल' चित्रपटामुळे मोठी लोकप्रियता मिळाली. यात तिने बबीता फोगाटची भूमिका साकारली होती. नंतर तिने अनेक चित्रपटांमधून अभिनय कौशल्य दाखवत प्रेक्षकांची कौतुकाची थाप मिळवली. यानंतर तिने अनेक चित्रपटात विविध भूमिका साकारल्या. याशिवाय ती सोशल मीडियावर देखील सक्रिय असते. नुकतेच सान्याने तिच्या इनस्टाग्राम अकाउंटवर तिचे काही हॉट आणि बोल्ड फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये मल्होत्रा पूर्णपणे काळ्या रंगाच्या कपड्यांमध्ये दिसत आहे. तिचा हा लुक अत्यंत बोल्ड आणि ग्लॅमरस आहे. यात तिने एकापेक्षा एक पोज देत अनेकांचे लक्ष वेधले आहे. सान्याचा हा अनोखा स्वॅग आणि हॉट अवतार सोशल मीडियावर चाहत्यांची मने जिंकत आहे.



# लग्नाशिवाय आई होण्याचा धाडसी निर्णय



बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री नीना गुप्ता आज त्यांचा ६७ वा वाढदिवस साजरा करत आहेत. अभिनयाइतक्याच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचीही नेहमीच चर्चा झाली आहे. अनेक अडचणी, टीका आणि सामाजिक दबावाला सामोरे जात त्यांनी स्वतःच्या अटींवर आयुष्य जगण्याचा मार्ग निवडला. त्यामुळे त्यांचा जीवनप्रवास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. १९८० च्या दशकात वेस्ट इंडिज क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर आला असताना नीना गुप्ता यांची भेट प्रसिद्ध क्रिकेटपटू विव्हियन रिचर्ड्स यांच्याशी झाली. पहिल्याच भेटीत दोघांमध्ये चांगली मैत्री झाली आणि नंतर त्यांचे नाते अधिक घट्ट झाले. मात्र त्यावेळी विवियन रिचर्ड्स विवाहित होते आणि त्यांना मुलेही होती. त्यामुळे या नात्याची मोठी चर्चा झाली. या नात्यादरम्यान नीना गुप्ता गर्भवती राहिल्या. विवियन रिचर्ड्स यांच्याशी विवाह होणे शक्य नसल्याने त्यांच्या आयुष्यासमोर मोठा प्रश्न उभा राहिला. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाची, नातेवाईकांची किंवा लोकांच्या टीकेची पर्वा न करता मूल जन्माला घालण्याचा निर्णय घेतला. त्या काळात लग्नाशिवाय आई होणे समाजासाठी धक्कादायक मानले जात होते. त्यामुळे त्यांना अनेक टीका आणि टोमण्यांना सामोरे जावे लागले. त्यांच्या कुटुंबातील काही सदस्यांनीही या निर्णयाला विरोध केला होता. तरीही नीना आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. त्यांनी मुलगी मसाबा गुप्ता हिला जन्म दिला आणि तिचा सांभाळ एकट्याने केला. आई आणि वडील अशा दोन्ही भूमिका त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. आज मसाबा गुप्ता भारतातील प्रसिद्ध फॅशन डिझायनर आणि उद्योजिका म्हणून ओळखली जाते. मुलीच्या यशात नीना यांच्या संघर्षाचा मोठा वाटा असल्याचे अनेकदा सांगितले जाते. मुलगी मोठी झाल्यानंतर नीना गुप्ता यांनी स्वतःच्या आयुष्याचा विचार करण्यास सुरुवात केली.

# मँचेस्टरमध्ये उघडणार वैभवच्या कारकिर्दीचा नवा अध्याय?

## इन्स्टा पोस्टने वाढवली उत्सुकता; वैभवच्या पदार्पणाकडे क्रिकेटविश्वाचे लक्ष

**महाईन्यूज ।** मँचेस्टर

**भारतीय क्रिकेटमधील युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची प्रतीक्षा अखेर संपण्याची शक्यता आहे. इंग्लंडविरुद्ध आज होणाऱ्या दुसऱ्या टी-२० सामन्यात त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळू शकते, अशी चर्चा रंगली आहे. या चर्चेला स्वतः वैभवने सोशल मीडियावरील एका पोस्टमुळे आणखी बळ दिले आहे.**




आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत तसेच इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात वैभवला अंतिम अकरामध्ये संधी मिळाली नव्हती. मात्र, दुसऱ्या सामन्यापूर्वी त्याने अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर स्वतःचा फोटो शेअर करत "NEW CHAPTER" असे कॅप्शन दिले. या पोस्टनंतर त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची शक्यता वर्तवली जात आहे.

पहिल्या सामन्यात सलामीवीर संजू सॅमसनला अपेक्षित कामगिरी करता आली नसल्याने वैभवला संधी द्यावी, अशी मागणी अनेक क्रिकेटप्रेमी आणि तज्ज्ञांकडून होत आहे. दुसरीकडे, काहींच्या मते एवढ्या कमी वयात त्याला घाईने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उतरविण्यापेक्षा योग्य वेळेची प्रतीक्षा करणे अधिक योग्य ठरेल.

दरम्यान, सामन्याच्या पूर्वसंध्येला भारताचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मॉर्केल यांनी संघ व्यवस्थापन वैभवच्या बाबतीत घाई करणार नसल्याचे स्पष्ट केले. संघात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनसारखे अनुभवी पर्याय उपलब्ध असून, सध्याच्या खेळाडूंवर विश्वास ठेवणे हेच संघ व्यवस्थापनाचे धोरण असल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, प्रशिक्षकांच्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर वैभवची सोशल मीडिया पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे आजच्या सामन्यात भारतीय संघाच्या अंतिम अकरामध्ये वैभव सूर्यवंशीला संधी मिळते का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### 'न्यू चॅप्टर' पोस्टमुळे रंगली चर्चा...

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यापूर्वी वैभव सूर्यवंशीने इंस्टाग्रामवर "NEW CHAPTER" असे कॅप्शन देत फोटो शेअर केला. या पोस्टनंतर त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाच्या चर्चांना वेग आला आहे. मात्र, अंतिम निर्णय संघ व्यवस्थापनाच्या प्लेइंग इलेव्हन घोषणेनंतरच स्पष्ट होणार आहे.

# मेस्सी-रोनाल्डोंच्या लढतीची वेळ ठरली; कोण कधी खेळणार?




**महाईन्यूज ।** नवी दिल्ली

**फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेतील साखळी फेरी संपल्यानंतर आता स्पर्धा निर्णायक टप्प्यात प्रवेश करत आहे. आज (४ जुलै) पासून राउंड ऑफ १६ (प्री-क्वार्टर फायनल) सामन्यांना सुरुवात होत असून, पुढील चार दिवसांत होणाऱ्या आठ 'करो वा मरो' लढतींमधून उपांत्यपूर्व फेरी गाठणारे आठ संघ निश्चित होणार आहेत**

आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत तसेच इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात वैभवला अंतिम अकरामध्ये संधी मिळाली नव्हती. मात्र, दुसऱ्या सामन्यापूर्वी त्याने अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर स्वतःचा फोटो शेअर करत "NEW CHAPTER" असे कॅप्शन दिले. या पोस्टनंतर त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची शक्यता वर्तवली जात आहे.

पहिल्या सामन्यात सलामीवीर संजू सॅमसनला अपेक्षित कामगिरी करता आली नसल्याने वैभवला संधी द्यावी, अशी मागणी अनेक क्रिकेटप्रेमी आणि तज्ज्ञांकडून होत आहे. दुसरीकडे, काहींच्या मते एवढ्या कमी वयात त्याला घाईने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उतरविण्यापेक्षा योग्य वेळेची प्रतीक्षा करणे अधिक योग्य ठरेल.

दरम्यान, सामन्याच्या पूर्वसंध्येला भारताचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मॉर्केल यांनी संघ व्यवस्थापन वैभवच्या बाबतीत घाई करणार नसल्याचे स्पष्ट केले. संघात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनसारखे अनुभवी पर्याय उपलब्ध असून, सध्याच्या खेळाडूंवर विश्वास ठेवणे हेच संघ व्यवस्थापनाचे धोरण असल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, प्रशिक्षकांच्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर वैभवची सोशल मीडिया पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे आजच्या सामन्यात भारतीय संघाच्या अंतिम अकरामध्ये वैभव सूर्यवंशीला संधी मिळते का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### 'करो वा मरो' म्हणजे काय?

प्री-क्वार्टर फेरीपासून स्पर्धा पूर्णपणे नॉकआऊट स्वरूपात खेळवली जाते. त्यामुळे प्रत्येक सामना 'करो वा मरो'चा असतो. विजय मिळवणारा संघ थेट उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) फेरीत प्रवेश करतो, तर पराभूत संघाचे विश्वचषकातील आव्हान तात्काळ संपुष्टात येते.

### दिग्गजांवर असणार चाहत्यांची नजर

प्री-क्वार्टर फेरीत फुटबॉलप्रेमींचे लक्ष लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिनावर, क्रिस्टियानो रोनाल्डोच्या पोर्तुगालवर आणि किलियन एम्बापेच्या फ्रान्सवर असणार आहे. या तिन्ही संघांवर विजेतेपदाचे प्रबळ दावेदार म्हणून पाहिले जात असून, नॉकआऊट फेरीतील त्यांची कामगिरी स्पर्धेचे चित्र बदलू शकते.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 05 जुलै 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पवना प्रकल्प!

## शेतकरी, भूमिपुत्र संघटनांच्या प्रतिनिधींसोबत लवकरच स्वतंत्र बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणाऱ्या महत्त्वाकांक्षी पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत मावळातील शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांना पूर्ण विश्वासात घेतल्याशिवाय प्रकल्प पुढे नेऊ नये, अशी ठाम भूमिका आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मांडली. त्यानंतर मुख्यमंत्री महोदय यांनी पुढील आठवड्यात शेतकरी व संघटनांच्या प्रतिनिधींसोबत स्वतंत्र बैठक घेऊन त्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**

पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत विधान भवन, मुंबई येथे झालेल्या या बैठकीत प्रकल्पातील प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर अडथळ्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह मावळ आणि पिंपरी-चिंचवडील प्रमुख लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग, नगरविकास विभाग, महसूल विभाग, रेल्वे, एमएसआरडीसी, महावितरण, पीएमआरडीए आणि इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शहराची वाढती लोकसंख्या, पवना नदीतील वाढते प्रदूषण आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता प्रकल्प अत्यंत आवश्यक असल्याचे मान्य करतानाच, बाधित शेतकऱ्यांच्या हितालाही तितकेच प्राधान्य दिले जाईल, अशी भूमिका राज्य शासनाने स्पष्ट केली.

बैठकीत आमदार महेश लांडगे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मागण्यांना आमचा कोणताही विरोध नसून, शेतकऱ्यांच्या मागण्या, पुनर्वसन आणि स्थानिकांच्या भावना यांचा सन्मान राखूनच प्रकल्पाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी केली. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत प्रकल्पाचे काम सुरू करू नये. शेतकऱ्यांनी आंदोलन किंवा वादाची भूमिका घेवू नये. गेल्यावेळी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता. त्यामुळे या प्रकल्पाला वेगळे वळण लागले. मात्र, यावेळी तसे होणार नाही. प्रत्येक घटकाने हा प्रकल्प शेतकरी, भूमिपुत्रांबाबत सहानुभूती आणि व्यापक लोकहिताच्या दृष्टीने पहावा, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीत पवना नदीतील वाढत्या प्रदूषणाबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. विविध प्रयोगशाळांमधील अहवालानुसार पाण्यात PFAS (Forever Chemicals), Phthalates, औद्योगिक रसायने, कीटकनाशकांचे अंश, औषधांचे अवशेष आणि कॅफिन आढळल्याची माहिती देण्यात आली. या पार्श्वभूमीवर शहराला भविष्यात सुरक्षित आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी थेट जलवाहिनी प्रकल्पाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. सध्या सुमारे ३५ लाख असलेली पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या पुढील काही दशकांत एक कोटींच्या घरात वाढण्याचा अंदाज असल्याने भविष्यातील जलसुरक्षेसाठी हा प्रकल्प अत्यावश्यक असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. उर्वरित भूसंपादन, रेल्वे आणि एमएसआरडीसीच्या परवानग्या, महावितरणच्या वीजजोडण्या, पीएमआरडीए हद्दीतील अडथळे आणि विविध विभागांतील समन्वय यावरही सविस्तर चर्चा झाली आहे.





> २०११ मध्ये पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या आंदोलनात तीन शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले, तर १२ शेतकरी जखमी झाले. भविष्यात अशी संवेदनशील आणि दुर्दैवी परिस्थिती पुन्हा निर्माण होता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत मावळातील शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घेतल्याशिवाय हा प्रकल्प पुढे नेला जाणार नाही. त्यामुळे विविध शेतकरी संघटना, स्थानिक संस्था आणि ग्रामस्थांनीही हा प्रकल्प संघर्षाच्या नव्हे, तर सर्वसमावेशक आणि न्याय्य भूमिकेतून पाहावा. संवादातून मार्ग काढत शेतकऱ्यांचे हित अबाधित ठेवूनच पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील जलसुरक्षेचा प्रश्न सोडविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या बैठकीनंतर पुढील दिशा स्पष्ट होईल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, "हा प्रकल्प भविष्यासाठी आवश्यक आहे. मात्र शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण करूनच पुढे जाऊ. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही," असे स्पष्ट करत आंदोलनात जखमी झालेल्या १२ शेतकऱ्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच पुनर्वसन, नुकसानभरपाई आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या सर्व बाबींवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. तसेच, प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करून त्यांचे पुनर्वसन प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील.

# सांगवी जिल्हा रुग्णालय आता 'सुपरस्पेशालिटी' : आमदार जगताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सांगवी जिल्हा रुग्णालय अधिक सक्षमपणे चालवण्यासाठी आणि या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पार्श्वभूमीवर राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनी शनिवारी रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन सोयी-सुविधांची पाहणी केली. आगामी काळात सांगवी जिल्हा रुग्णालयाचे रूपांतर 'सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल' मध्ये केले जाईल, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही त्यांनी यावेळी दिली. रुग्णालयातील यंत्रसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून ती अधिक गतिमान करण्यासाठी आमदार जगताप यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.**



सांगवी जिल्हा रुग्णालयामध्ये शनिवारी डॉ. प्रकाश अबिटकर यांनी भेट दिली. यावेळी आमदार शंकर जगताप यांनी त्यांना रुग्णालयातील परिस्थितीचा आढावा दिला. यावेळी आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, सहसंचालक डॉ.सुनिता गोलाईत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने उपस्थित होते. रुग्णालयातील आरोग्य सेवा, रुग्ण सुविधा, औषधसाठा, तसेच उपचार व्यवस्थेचा यावेळी त्यांनी सविस्तर आढावा घेतला. विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थिती जाणून घेतली तसेच आवश्यक सुधारणा व तातडीच्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

यावेळी बोलताना डॉ. आबिटकर म्हणाले, "सांगवी जिल्हा रुग्णालयात सध्या पुरेशा प्रमाणात आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध आहे. ही यंत्रसामग्री अधिक प्रभावीपणे आणि गतिमान पद्धतीने रुग्णांच्या सेवेत कशी वापरता येईल, यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील. रुग्णालयाचा दर्जा उंचावून सामान्य माणसाला खाजगी हॉस्पिटल्सच्या तोडीस तोड मोफत आणि दर्जेदार उपचार मिळवून देणे हेच आमचे ध्येय आहे."या भागातील नागरिकांना किरकोळ किंवा गंभीर आजारांच्या उपचारासाठी मुंबई किंवा इतर मोठ्या शहरांतील रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागू नये, अशी आमदार जगताप यांची भूमिका आहे . सुपर स्पेशालिटी दर्जा मिळाल्यास रुग्णालयात हृदयरोग, मेंदूविकार, किडनी विकार यांसारख्या गंभीर आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार होण्याचा मार्ग मोकळा होइल असे डॉ. आबिटकर यांनी सांगितले.

> पिंपरी-चिंचवड तसेच लगतच्या ग्रामीण परिसरातील सर्वसामान्य, गरीब रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांमध्ये किंवा महागड्या खाजगी रुग्णालयांमध्ये जावे लागू नये, हे आमचे स्वप्न आहे. आज आरोग्यमंत्र्यांनी सांगवी रुग्णालयाची पाहणी करून या रुग्णालयाला 'सुपर स्पेशालिटी' दर्जा देण्याची जी ग्वाही दिली आहे, बद्दल मी त्यांचा आभारी आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.**

# मालमत्ता कर ऑनलाइन भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत

## ३५ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांना नोटिसा; कर न भरल्यास जप्तीची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत जे मालमत्ताधारक चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ चा मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने भरतील, त्यांना सामान्य करावर ४ टक्के सवलत दिली जाणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी तत्काळ ऑनलाइन कर भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे.**



कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरणा, उपलब्ध सवलत योजना, कर भरण्याची अंतिम मुदत तसेच थकबाकीबाबतची माहिती एसएमएसद्वारे वेळोवेळी मालमत्ताधारकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. यासोबतच टेली कॉलिंगच्या माध्यमातून मालमत्ताधारकांशी थेट संपर्क साधून त्यांच्या कर भरण्याच्या स्थितीची माहिती देण्यात येत आहे. उपलब्ध सवलतींचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते, व ऑनलाइन आणि प्रत्यक्ष कर भरण्याच्या सुविधांची माहितीही देण्यात येते. मालमत्ताधारकांकडून प्राप्त होणाऱ्या शंका व अडचणींची नोंद घेऊन त्यांचे संबंधित विभागामार्फत निराकरण करण्यात येते.

डेटा-आधारित संवाद प्रणालीचा अवलंब केल्यामुळे प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत आवश्यक माहिती नियोजनबद्ध पद्धतीने पोहोचविणे शक्य झाले आहे. त्याचबरोबर जनजागृती, थेट संवाद आणि माहितीचे नियमित प्रसारण यामुळे मालमत्ता कर भरण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळण्यास मदत झाली आहे. मात्र अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कर भरला नाही, त्यांच्यासाठी आता ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरल्यास सामान्य करावर ४ टक्के सवलत देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर जप्तीची कारवाई सुरु केली आहे. या मोहिमेअंतर्गत १८ विभागीय कार्यालयांमार्फत आतापर्यंत ३५ हजाराहून अधिक मालमत्ताधारकांना जप्तीपूर्वी नोटीस बजावण्यात आली आहे. ज्या थकबाकीदारांना नोटीस देऊनही पहिल्या तिमाहीत कर भरला नाही अशा मालमत्तांवर कारवाई करण्यास कर संकलन विभागाने सुरवात केली आहे. यामध्ये बिगर निवासी,औद्योगिक,मिश्र मालमत्ताधारकांवर थेट जप्ती करणे कारवाई करण्यात येणार तर निवासी मालमत्ता धारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येणार आहे.



“ पहिल्या तिमाहीत मोठ्या संख्येने मालमत्ताधारकांनी वेळेत मालमत्ता कर भरून सवलत योजनेचा लाभ घेतला. यासाठी सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार. ज्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी ऑनलाईन कर भरून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. आपला कर हा शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा वाटा आहे. चला, जबाबदार नागरिक म्हणून वेळेत कर भरून पिंपरी-चिंचवडच्या विकासात सहभागी होऊया.

**- रवी लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# मोफत आरोग्य तपासणी शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जनजागृती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राष्ट्रीय डॉक्टर्स डेच्या निमित्ताने भोसरी येथील एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या कार्याला मानवंदना देत आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारे विविध कार्यक्रम सादर केले.**






कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ. रवींद्र पांडुरंग जांगळे (बीडीएस), डेंटल केअर अँड इम्प्लांट सेंटर, तसेच स्वप्नील पांडुरंग गावळी, कोमल स्वप्नील गावळी, सुप्रिया मुळे आणि पल्लवी पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या समाजातील योगदानावर आधारित भाषणे, कविता, नृत्य, नाटिका आणि आरोग्य, स्वच्छता तसेच निरोगी जीवनशैलीवर आधारित सादरीकरणे केली. वर्गखोल्या, सॉफ्ट बोर्ड, रांगोळी आणि संपूर्ण शाळा परिसर आरोग्य जनजागृतीपर संदेशांनी सजविण्यात आला होता.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैली, वैयक्तिक स्वच्छता आणि दंत आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. समारोपप्रसंगी एकता जाधव, तैसीन मुलाणी आणि पल्लवी पवार यांनी मान्यवर, शाळा व्यवस्थापन, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैद्यकीय व्यवसायाविषयी आदराची भावना अधिक दृढ झाली असून आरोग्य, स्वच्छता आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

“ एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास जितका महत्त्वाचा आहे, तितकाच त्यांच्या आरोग्यदायी आणि सुसंस्कृत जीवनशैलीचा विकासही आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त आयोजित उपक्रमातून विद्यार्थ्यांना डॉक्टरांच्या कार्याचा परिचय, आरोग्याबाबत जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली. अशा उपक्रमांमधून निरोगी, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील.

**- प्रवीण गायकवाड, प्राचार्य.**

# Health Minister Abitkar, MLA Shankar Jagtap Review Healthcare Services at Sangvi District Hospital

**MAHAENEWS I PIMPRI-CHINCHWAD**

**Maharashtra Health Minister Dr. Prakash Abitkar and MLA Shankar Jagtap conducted a comprehensive inspection of the District Hospital at Sangvi to review the quality of healthcare services and assess the overall functioning of the government healthcare facility.**



During the visit, the Health Minister and MLA Jagtap were accompanied by newly appointed District Civil Surgeon Dr. Ambadas Devmane and senior health officials.

The delegation reviewed patient care services, hospital infrastructure, availability of medicines, treatment facilities, and the functioning of various departments. They also interacted with hospital officials to understand existing challenges and directed them to implement necessary improvements to enhance the quality and efficiency of healthcare delivery.

Health Minister Dr. Prakash Abitkar emphasized the State Government's commitment to strengthening public healthcare infrastructure and ensuring that citizens receive timely, affordable, and quality medical services. He instructed officials to address critical issues on priority and improve patient-centric services across the hospital.

MLA Shankar Jagtap reiterated that providing accessible and efficient healthcare to the residents of Sangvi and the surrounding areas remains a top priority. He assured that continuous follow-up would be undertaken to strengthen hospital infrastructure, improve medical facilities, and ensure better healthcare outcomes for the people.

The inspection reflects the Maharashtra Government's continued focus on upgrading public health institutions and delivering quality healthcare services to every citizen.

> Quality healthcare is the right of every citizen, not a privilege. Our priority is to ensure that the people of Sangvi and the surrounding areas receive timely, affordable, and efficient medical treatment. We are committed to strengthening the District Hospital with better infrastructure, adequate medical staff, modern facilities, and uninterrupted healthcare services. Every necessary effort will be made to make this hospital a reliable healthcare centre for the common people.
>
> **– MLA Shankar Jagtap.**

# Sahyadris:Where Every Trail Tells a story

**"The best views come after the hardest climbs." The Sahyadris seem to live by this thought.**

They may appear as silent mountains from a far but every trail, every breeze, and every valley has a story waiting to be discovered.

As down paints the peaks with golden light, mist gently drifts through the forests and waterfalls find their voice.The Sahyadris have watched centuries unfold, standing quietly through changing seasons and passing generations. Their paths lead not only to breathtaking views but also to forgotten forts, hidden streams, and landscapes that seem untouched by time.

Yet,the true wonders of the Sahyadris are not always the ones visible at first glance. Beneath their green canopy thrive rare plants, unique wildlife ,and remarkable natural phenomena that make these mountains one of nature's finest treasures. Every visit reveals something different, making no two journeys ever the same.

What makes the Sahyadris unforgettable,however,isn't not just what they hold but what they awoken.For from the hurried rhythm of everyday life,they invite us to notice the little things—the melody of birds, the scent of rain—soaked earth and the quiet strength of nature.

Perhaps that is why every trek feels different. The destination may be the some, but each journey leaves behind a new lesson. Reaching the summit is not only a milestone: the real reward is the resilience, humility and appreciation for nature that the journey quietly instil.

The Sahyadris never ask to be admired.They simply stand—timeless, resilient and alive. And for those willing to listen, every trail tells a story worth carrying home.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE



**Neeti Prashant Bhangre**
**Grade X (Ionian)**

**Priyadarshani School. Moshi**